| वर्ष - 9 | अंक -31 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | सोमवार, दि. 22 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



आज पहिली माळ
शैलपुत्रीदेवी

नवरात्र उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा !



## अर्थव्यवस्थेला मिळणार बुस्टर | पंतप्रधान मोदींचा आत्मनिर्भरतेचा नारा

# आजपासून जीएसटी उत्सव!

## स्वदेशी वस्तू खरेदी करण्यावर भर देण्याचे आवाहन



**| नवी दिल्ली | प्रतिनिधी | महाईन्यूज**

**वस्तू व सेवा करातील (जीएसटी २.०) नवी द्विस्तरीय दररचना सोमवारपासून (दि.२२) लागू होत आहे. अप्रत्यक्ष करातील ही सुधारणा म्हणजे 'बचत उत्सव' असून त्यामध्ये देशवासीयांना सहभागी होण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरचित्रवाणीवरून रविवारी देशाला उद्देशून केलेल्या वीस मिनिटांच्या भाषणामध्ये केले.**

केंद्र सरकारने चालू आर्थिक वर्षापासून वार्षिक १२ लाखांचे उत्पन्न करमुक्त केले आहे. शिवाय, 'जीएसटी २.०'च्या सुलभीकरणामुळे दैनंदिन वापराच्या ९९ टक्के वस्तू ५ टक्के कर टप्प्यात आल्या आहेत. या दोन्हींचा एकत्रित परिणाम पाहिला तर गेल्या वर्षभरात जनतेची २.५ लाख कोटी रुपयांहून अधिक बचत होऊ शकेल. त्याचा सर्वाधिक लाभ गरिबीतून आत्ताच बाहेर आलेल्या २५ कोटी नव मध्यमवर्गाला होणार असल्याचा दावा मोदींनी केला. 'जीएसटी'तील नवी सुधारणांमधून 'नागरिक देवो भव' हा मंत्र दिला आहे, असा दावा मोदींनी केला.

'जीएसटी'चे शून्य, ५, १२, १८ व २४ टक्के असे पाच दरटप्पे होते. त्यामध्ये नुकतेच सुलभीकरण करण्यात आले असून ५ व १८ हे दोनच दरटप्पे कायम ठेवण्यात आले आहेत. अन्नपदार्थ, औषधे, साबण, टूथब्रश, टूथपेस्ट, आरोग्य व जीवनविमा अशा अनेक वस्तूंवर करमाफ असेल वा फक्त ५ टक्के कर आकारला जाईल. 'जीएसटी'चे दर कमी झाल्यामुळे लोकांना वैयक्तिक स्वप्ने पूर्ण करणे सोपे होईल. मग, ते घर बांधणे असो, टीव्ही वा फ्रीज खरेदी करणे असो वा स्कूटर, बाइक, कार खरेदी करणे असो. या वस्तू आता त्यांना स्वस्तात मिळू शकतील. सर्वसामान्यांना प्रवासही परवडणारा असेल. कारण बहुतांश हॉटेल खोल्यांवरील जीएसटीचे दर कमी झालेले आहेत, असे सांगत मोदींनी देशांतर्गत बाजारपेठेला चालना मिळण्याचा आशावाद व्यक्त केला.

### स्वदेशीचा गर्व बाळगा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणामध्ये थेट अमेरिकेचा उल्लेख टाळला असला तरी, देशाने आत्मनिर्भर झाले पाहिजे. स्वदेशी वस्तू वापरल्याचा गर्व बाळगला पाहिजे, असा संदेश मोदींनी दिला. स्वदेशी वापराच्या धोरणामुळे देशाच्या उत्पादन क्षेत्राचा कणा असलेल्या सूक्ष्म व लघू उद्योगांना मोठी चालना मिळेल, अशी ग्वाहीही मोदींनी दिली.

अनेक परदेशी वस्तू नकळत आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनल्या आहेत. आपल्या खिशातील कंगवा परदेशी की स्वदेशी, हेही कोणाला आता माहीत नाही. अशा परावलंबनातून मुक्त झाले पाहिजे. भारतीय बनावटीच्या वस्तू लोकांनी खरेदी केल्या पाहिजेत. प्रत्येक घर स्वदेशीचे प्रतीक बनले पाहिजे आणि प्रत्येक दुकान स्वदेशी वस्तूंनी सजले पाहिजे, असे आवाहन मोदींनी केले. आपापल्या प्रदेशातील उत्पादनक्षमता वाढवावी आणि गुंतवणुकीला पोषक वातावरण निर्माण करावे. केंद्र व राज्ये एकत्रितपणे पुढे गेली तर आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार होईल, प्रत्येक राज्य विकसित होईल आणि भारत विकसित राष्ट्र बनेल, असा दावा मोदींनी केला. 'जीएसटी'च्या या नव्या सुधारणांमुळे देशाच्या आर्थिक इतिहासातील नव्या अध्यायाची सुरुवात झाली आहे. ही प्रक्रिया त्यांना अधिक सोपी वाटत होती, असे मोदी म्हणाले. त्यासाठी मोदींनी परदेशी वृत्तपत्रामध्ये छापून आलेल्या यासंदर्भातील बातमीचे उदाहरण दिले. एका कंपनीने माल बेंगळूरुहून हैदराबादला थेट न नेता, तो आधी युरोपला पाठवला व तिथून तो हैदराबादला आयात केला. आता करांचे सुलभीकरण झाल्यामुळे मालवाहतूक स्वस्त झाली आहे, त्याचा लाभ अंतिमतः गरीब व मध्यमवर्गाला मिळेल, असे मोदी म्हणाले. एक देश, एक कररचना हे स्वप्न राज्यांच्या सहमतीने पूर्ण करता आले, असेही मोदींनी सांगितले.

> "'मी स्वदेशी खरेदी करतो, मी स्वदेशी विकतो' ही भावना प्रत्येक देशवासीयांच्या मनात रुजली पाहिजे. तर विकासाला गती मिळेल. राज्य सरकारांनी 'आत्मनिर्भर भारत' आणि स्वदेशी मोहिमांना पाठबळ द्यावे.
> -–**नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

#### करदात्यांसाठी दिलासा

पंतप्रधान मोदी म्हणाले, "सरकारने चालू आर्थिक वर्षापासून १२ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न करमुक्त करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांना थेट फायदा होईल." या सुधारणा करदात्यांना प्रामाणिकपणे कर भरण्यास प्रोत्साहन देतील.

#### उद्योग व व्यापाऱ्यांना फायदा

जीएसटीच्या पुढील टप्प्यातील सुधारणा म्हणजेच 'जीएसटी २.०'मुळे उद्योग व व्यापाऱ्यांसाठीची करप्रक्रिया अधिक सोपी होईल.

देशातील नामांकित व्यवस्थापन शिक्षणसंस्था संस्थेच्या अधिष्ठाता समितीने मान्यता दिल्यानंतर हा निर्णय अधिकृत

# आयआयएम मुंबईचे केंद्र आता पुण्यात!

## केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा प्रस्ताव मंजूर

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुण्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार असून नवे शैक्षणिक द्वार खुले होत आहे. देशातील नामांकित व्यवस्थापन शिक्षणसंस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आयआयएम मुंबईचे केंद्र आता पुण्यात सुरु होत आहे. केंद्रीय नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मांडलेल्या प्रस्तावाला संस्थेच्या अधिष्ठाता समिती आणि त्यानंतर विद्या परिषदेने मान्यता दिल्यानंतर हा निर्णय अधिकृत झाला आहे.**




आयआयएम मुंबईचे केंद्र पुण्यात व्हावे, यासाठी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी प्रस्ताव दिला होता. त्यावर निर्णय होत पुणे केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे केंद्राची स्थापना ही केवळ पुण्याच्या नव्हे, तर महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि औद्योगिक परंपरेतील एक ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे. पुणे हे देशातील अग्रगण्य तंत्रज्ञान व औद्योगिक केंद्र म्हणून जलद गतीने विकसित होत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे जाळे, अत्याधुनिक संशोधन-विकास केंद्रे, वाढती स्टार्टअप संस्कृती आणि ऑक्सफर्ड ऑफ द इस्ट अशी मिळालेली शैक्षणिक ओळख या सर्व पार्श्वभूमीवर आयआयएम मुंबईचा कॅम्पस शहरासाठी केवळ नैसर्गिक पूरकच ठरणार नाही, तर जागतिक दर्जाच्या व्यवस्थापन शिक्षणाला इथल्या विद्यार्थ्यांना थेट दाराशी आणून देणार आहे.

या कॅम्पसच्या माध्यमातून उद्योजकतेला नवा उन्मेष मिळेल, व्यवस्थापन कौशल्यांचा वापर करून नाविन्यपूर्ण कल्पनांचे यशस्वी व्यवसायांत रूपांतर साधता येईल. हा उपक्रम स्वावलंबी भारताच्या संकल्पनेशी सुसंगत असून विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय दृष्टिकोनाला बळकटी देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

याबाबत माहिती देताना आयआयएम मुंबईचे संचालक प्रा. मनोज कुमार तिवारी म्हणाले, 'आमचा प्रयत्न राहील की शैक्षणिक वर्ष २०२६ पासून प्रस्तावित पुणे केंद्रात क्षमता विकास कार्यक्रम तसेच अल्पावधी कार्यकारी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करता यावेत.

ही महत्त्वाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. यामुळे आयआयएम मुंबईला विकसित भारत २०४७ या ध्येयाच्या दिशेने मोलाचे योगदान देता येईल.'

> 'पुण्यात आयआयएम मुंबईचे केंद्र स्थापन होणे ही अभिमानाची बाब आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी आणि पुणे हे तंत्रज्ञान व शिक्षणाचे केंद्र आहे. या दोन्ही शहरांमध्ये निर्माण होणारा 'नॉलेज कॉरिडॉर' ही देशाच्या औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रासाठी नवी पर्वणी ठरेल. या निर्णयामुळे महाराष्ट्राला जागतिक दर्जाच्या व्यवस्थापन शिक्षणाची नवी ऊर्जा मिळेल आणि नव्या पिढीसमोर संधींचे विस्तीर्ण क्षितिज खुले होईल. पुणे अनेक दशकांपासून देशाचे प्रमुख शैक्षणिक केंद्र राहिले आहे आणि आता ते तंत्रज्ञान, उत्पादन तसेच आयटीचे बळकट हब म्हणूनही उदयास आले आहे. याच वैशिष्ट्यांचा विचार करून आयआयएम मुंबई आपला नवा कॅम्पस पुण्यात स्थापन करीत आहे.
>
> -- **मुरलीधर मोहोळ,** केंद्रीय राज्यमंत्री

# दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना नुकसानभरपाई!

## कर्जमाफीवर विश्वास; कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे आश्वासन

। बारामती ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजप नेते गोपीचंद पडळकर यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचे आश्वासन दिले. तसेच कर्जमाफीबाबत योग्य वेळी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री निर्णय घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राजकारणात वैयक्तिक टीका टाळण्याचे आवाहनही भरणे यांनी केले.**



पुणे जिल्ह्यातील भिगवण येथील ग्रामीण रुग्णालयात 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' या अभियानाचे उद्घाटन त्यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना सध्याच्या घडामोडींवर प्रतिक्रिया दिली.

**दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई**

मे महिन्यातील अतिवृष्टीमुळे झालेले पंचनामे पूर्ण झाले असून काही शेतकऱ्यांना नुकसानभरपाई अद्याप मिळालेली नाही. सध्या देखील अनेक भागांत पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. याचे पंचनामे सुरू असून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना भरपाई देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे भरणे म्हणाले.

**कर्जमाफीवर योग्य वेळी निर्णय**

कर्जमाफीबाबत विचारले असता, "शेतकरी सतत अडचणीत आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट यामुळे त्यांचे प्रचंड नुकसान होत असते. शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. कर्जमाफीसंदर्भात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री योग्य वेळी निर्णय घेतील," असा विश्वास कृषिमंत्र्यांनी व्यक्त केला.

**अधिकाऱ्यांच्या कामकाजावरही भाष्य**

रोहित पवारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर प्रतिक्रिया देताना भरणे म्हणाले, "मी काल अकोला, वाशिम, हिंगोली, नांदेड दौऱ्यावर होतो. अधिकारी कामकाज करताना थोडं कमी-जास्त होत असेल. एखादा अधिकारी चुकला असेल, तर त्याची नोंद करून योग्य ती कारवाई करणे गरजेचे आहे."

> "शेतकरी आज दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट अशा संकटांना सामोरे जात आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. कर्जमाफीसंदर्भात मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री योग्य वेळी निर्णय घेतील, दरम्यान, त्यांनी भाजप नेते गोपीचंद पडळकर यांच्यावर वैयक्तिक टीका योग्य नाही.
>
> **-दत्तात्रय भरणे,** कृषीमंत्री

### कर्जमाफीवर योग्य वेळी निर्णय

**पडळकरांच्या टीकेवर प्रतिक्रिया; राजकारणात वैयक्तिक टीका टाळावी – भरणेंचा विश्वास**

**अतिवृष्टी व पावसाचे पंचनामे सुरू; लवकरच भरपाई वाटप**

**अधिकाऱ्यांच्या कामकाजात त्रुटी असल्यास कारवाई होईल**

## स्वराज्य संस्थांच्या निवडणुका — सर्वच राजकीय पक्ष लागले तयारी

# '"युती"चा योग्य वेळी निर्णय घेऊ - अजित पवार

## महायुती सक्षम, मात्र स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घ्यावा लागेल

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**आगामी महापालिका निवडणूक युती की स्वबळावर लढायची याबाबतचा याचा निर्णय निवडणुका जाहीर झाल्यावर स्थानिक पातळीवरची परिस्थिती पाहून घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी (दि. २१) स्पष्ट केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष तयारी करीत आहेत. .**




राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) परिवार मिलन कार्यक्रमासाठी अजित पवार रविवारी सकाळी पिंपरीत आले होते. यावेळी पवार यांनी पत्रकारांसोबत संवाद साधला. पवार म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष तयारी करीत आहेत. आम्हीही तयारी करत आहोत. त्यासाठी दोन दिवस शहरातील परिवार मिलन कार्यक्रमांना उपस्थिती लावली. कार्यकर्त्यांच्या भावना समजावून घेतल्या. जनसंवादच्या माध्यमातून रस्ते, पाणी, वीज, कचरा या समस्या जाणून घेतल्या. प्रशासनाशी संवाद साधून प्रश्न मार्गी लावले. काही ठिकाणी नवीन विकास कामे करण्याबाबत चर्चा करण्यात आली. , अशी माहिती त्यांनी दिली. महापालिका की जिल्हा परिषद निवडणूक अगोदर होणार ? असे विचारले असता, पवार म्हणाले, मी ज्योतिषी नाही. ते निवडणूक आयोग ठरवेल. मनोज जरांगे यांनी कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी दसऱ्याचा अल्टीमेटम दिल्याबाबत पवार म्हणाले, 'राज्यकर्ते म्हणून कोणताही निर्णय घेतल्यानंतर वेगवेगळे मतप्रवाह पुढे येतात. वेगवेगळी भूमिका मांडतात. कोणत्याही वर्गाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही आणि ज्या मागण्या आहेत, त्या कायद्याच्या चौकटीत बसवत न्याय देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

आम्हीही तयारी करीत आहोत. महायुती सक्षम करण्याकडे आमचा प्रयत्न आहे, असेही पवार म्हणाले.

# पिंपरी-चिंचवड येथे 'नमो युवा रन' मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

## व्यसनमुक्ती, निरोगी व सुदृढ जीवनशैलीचा संदेश; विविध वयोगटांतील नागरिकांचा सहभाग

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने रविवारी सकाळी 'नमो युवा रन' मॅरेथॉनचे भव्य आयोजन करण्यात आले होते. 'एक दौड मोदीजी के नाम' या घोषणेने तरुणाईला एकत्र आणणाऱ्या या मॅरेथॉनमध्ये तरुण-तरुणींसह विविध वयोगटांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत, देशभक्ती आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश दिला.**



पिंपळे सौदागर येथील लिनीयर गार्डन येथून या मॅरेथॉनला सकाळी ६ वाजता सुरुवात झाली. स्पर्धकांनी कोकणे चौकातून ८ टु ८० पार्कपर्यंतचा मार्ग उत्साहात पूर्ण केला. या उपक्रमात सहभाग घेण्यासाठी कोणताही प्रवेश शुल्क आकारण्यात आला नव्हता, ज्यामुळे सर्वांसाठी हा एक खुला सोहळा बनला होता. हिरवा झेंडा दाखवून मॅरेथॉनला सुरुवात झाली. प्रसंगी झुंबा खेळाने सर्व सहभागींचा उत्साह वाढला. भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पिंपरी चिंचवड भाजपा शहर अध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, पिंपरी चिंचवडचे माजी पोलीस आयुक्त आयपीएस अधिकारी कृष्ण प्रकाश यांची प्रमुख उपस्थिती लाभली, ज्यामुळे कार्यक्रमाला एक विशेष प्रतिष्ठा मिळाली.

यावेळी इंडियन रोवर नॅशनल चॅम्पियन मृण्मयी साळगावकर यांच्यासह आयरमॅन भूषण तारक, पराग जोशी, सचिन नेमाडे, सतीश शिंदे, प्रशांत यादव यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाला आमदार महेश लांडगे, भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, जिल्हा संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, विकास डोळस, मधुकर बच्चे, वैशाली खाडये, चंद्रकांत नखाते, महेश कुलकर्णी, प्रवक्ते कुणाल लांडगे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस सुदर्शन पाटसकर, नमो युवा रनचे संयोजक अमृत मारणे, भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष तुषार हिंगे, निवेदिता एकबोटे, युवा मोर्चा प्रदेश सचिव अजित कुलथे, टाटा मोटर्स कामगार संघटनेचे नेते सचिन लांडगे यांच्यासह नगरसेवक -नगरसेविका, प्रदेश पदाधिकारी, युवा मोर्चा पदाधिकारी, विविध प्रकोष्ट पदाधिकारी, अनेक स्थानिक नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या मॅरेथॉनचा मुख्य उद्देश केवळ पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त एक उपक्रम साजरा करणे हा नव्हता, तर त्यामागे काही महत्त्वपूर्ण सामाजिक संदेश दडलेले होते. या उपक्रमातून युवकांमध्ये देशभक्तीची भावना रुजवणे, व्यसनमुक्तीचा संदेश देणे आणि निरोगी व सुदृढ जीवनशैलीचा प्रसार करणे हे मुख्य उद्दिष्ट होते. या मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. तरुण-तरुणी, ज्येष्ठ नागरिक आणि अगदी लहान मुलांनीही या मॅरेथॉनमध्ये उत्साहाने सहभाग घेतला.


या उपक्रमाने पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना एकत्र आणले आणि एका विधायक हेतूसाठी धावण्यास प्रोत्साहित केले.आभार युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव यांनी मानले.




# ‘एक चीन धोरणा’चा फेरविचार हवा

**भारत, अमेरिकेसह अनेक देशांनी ‘एक चीन धोरणा’चा (वन चायना पॉलिसी) स्वीकार केला आहे. या धोरणाचा अर्थ असा की, जगात एकच चीन आहे; तैवान हा चीनचा अविभाज्य भाग आहे. पण जो देश इतरांचे सार्वभौमत्व, त्यांना वाटणाऱ्या सुरक्षाविषयक चिंता या कशाचीच फिकीर करीत नाही, त्या देशाच्या भूमिकेवर आपणही प्रश्नचिन्ह का लावू नये?**

इतिहासात काही वळणे अशी येतात की, त्यावेळी पारंपरिक भूमिकांचा नव्याने विचार करावा लागतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर चीनच्या बाबतीत तशी वेळ आली आहे का, हा प्रश्न त्यामुळेच उपस्थित करावासा वाटतो. भारत, अमेरिकेसह अनेक देशांनी ‘एक चीन धोरणा’चा (वन चायना पॉलिसी) स्वीकार केला आहे. या धोरणाचा अर्थ असा की, जगात एकच चीन आहे. तैवान हा चीनचा अविभाज्य भाग आहे. पण जो देश इतरांचे सार्वभौमत्व, त्यांना वाटणाऱ्या सुरक्षाविषयक चिंता या कशाचीच फिकीर करीत नाही, त्या देशाच्या भूमिकेवर आपणही प्रश्नचिन्ह का लावू नये?तैवानमधील निवडणुकीत स्वातंत्र्यवादी पक्ष निवडून आल्याने या प्रश्नाची निदान चर्चा तरी व्हायला हवी. तैवानच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ‘डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी’च्या (डीपीपी) विल्यम लाय चिंग-ते यांचा विजय झाला आहे. थोडी



टक्केवारी कमी झाली असली तरी हा सलग तिसरा विजय महत्त्वाचाच. तैवान हा ‘स्वतंत्र आणि सार्वभौम’ राष्ट्र असल्याची ‘डीपीपी’ची भूमिका आहे. पाश्चात्य राष्ट्रांनी लाय चिंग-ते यांचे अभिनंदन केले. परंतु भारत, अमेरिकेसह जवळपास सगळ्या राष्ट्रांनी ‘एक चीन धोरण’ मान्य केले असून त्यात बदल नाही. ११ राष्ट्रांचे तैवानशी राजनैतिक संबंध आहेत.नौरु नावाच्या जवळपास १२,५०० लोकसंख्या असलेल्या देशाने निकालानंतर तैवानशी असलेले राजनैतिक संबंध तोडले आणि चीनशी प्रस्थापित केले. लाय चिंग-ते यांच्या विजयानंतर चीनने व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे, की तैवानचा मुद्दा ही चीनची अंतर्गत बाब आहे. तैवानमध्ये बदल होत असले तरी जगात मात्र एकच चीन आहे. स्वतंत्र तैवान आणि "दोन चीन" ला चीनचा विरोध असल्याचे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने तैवानच्या निकालानंतर स्पष्ट केले. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग तैवानला चीनमध्ये लवकरच सामील करण्यात येईल, असे नेहमी सांगत असतात.अमेरिकेची तैवानला वाचवण्याची भूमिका असल्याने चीन-अमेरिकेत तणाव आहे. उभय राष्ट्रांत असलेल्या तणावाच्या अनेक कारणांपैकी तैवान एक आहे. अमेरिकी प्रतिनिधिगृहाच्या सभापती नॅन्सी पेलोसी यांनी २०२२च्या ऑगस्ट महिन्यात तैवानचा दौरा केला होता आणि त्यामुळे चीनचे पित्त आणखीनच खवळले. अमेरिका व चीनमध्ये प्रचंड तणाव निर्माण झाला होता. अमेरिकेचा तैवानच्या लोकशाहीला पाठिंबा असल्याचे वक्तव्य पेलोसी यांनी तेव्हा केले होते. १९९७ नंतर तैवानचा दौरा करणाऱ्या नॅन्सी पेलोसी अमेरिकेच्या पहिल्या वरिष्ठ नेत्या होत्या. काँग्रेसचे खासदार मनीष तिवारी यांनी पेलोसी यांच्या तैवानच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी खासदारांचे एक शिष्टमंडळ तैवानला गेले पाहिजे, अशी सूचना केली होती. २०२२च्या ऑगस्ट महिन्यात चीनचे दिल्लीतील राजदूत सुन वेडोंग यांनी म्हटलं, की चीनची अपेक्षा आहे की भारत ‘एक चीन धोरणा’च्या बाजूला कायम राहील आणि पेलोसींच्या दौऱ्यामागील ‘दुष्ट राजकीय हेतू’ समजून घेईल. ‘एक चीन धोरणा’मुळे भारताचे तैवानशी संबंध असले तरी ते राजनैतिक स्वरुपाचे नाहीत. नवी दिल्ली येथे तैवानचे कार्यालय आहे; पण त्याला दूतावास म्हटले जात नाही. ‘तैपेई इकॉनोमिक अँड कल्चरल सेंटर’ असे नाव त्याला देण्यात आले आहे. कामाचे स्वरूप मात्र दूतावासारखेच आहे. चीनमध्ये अनेक वर्षाच्या यादवी युद्धानंतर १९४९ ला माओ-त्से-तुंग यांच्या नेतृत्वाखालील कम्युनिस्ट पक्षाने विजय मिळवला. त्यानंतर विरोधी नेते चँग-कै-शेक यांच्या नेतृत्वाखालील लोक तैवानला पळून गेले. सुरुवातीला ‘रिपब्लिक ऑफ चायना (तैवान) संयुक्त राष्ट्रांचा सदस्य होता. पण चीनचा वाढता प्रभाव आणि अमेरिकेसोबत सुधारलेल्या संबंधांमुळे ऑक्टोबर १९७१ मध्ये ‘पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना’ (चीन) ला संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्व देण्यात आले.

## प्रासंगिक »

### कोठे तरी रमला!

***प्रगतिपथावरील स्वत:च्या कुंठितावस्थेसाठी एकदा का इतरांस जबाबदार धरण्याची सवय लागली की सुधारणांची गरज वाटेनाशी होते. त्यातून ‘आपले उत्तमच सुरू आहे.***

ही मानवी प्रवृत्तीच. पण या प्रवृत्तीस दूर सारून जे सुधारणा करतात तेच पुढे जातात. स्वत:च्या प्रगतीसाठी इतरांस दोष देण्याने आत्मसुख मिळते. पण प्रत्यक्षात ती आत्मवंचना असते. ही प्रस्तावना सरसंघचालक मोहनराव भागवत यांनी सध्याच्या भारत-अमेरिका व्यापार युद्धावर केलेल्या टिप्पणीवर भाष्य करण्याआधीचे ‘स्वागतगीत’. \नागपुरात प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय आयोजित समारंभात बोलताना भागवत यांनी भारत-विषयक अनेक मुद्द्यांवर भाष्य केले. “मनात आपलेपणाची भावना असेल तर सुरक्षेचा प्रश्नच येत नाही खचितच स्वागतार्ह ठरतात.

भारत इतिहासाच्या कोणत्याही टप्प्यावर आक्रमक नव्हता आणि “वसुधैव कुटुंबकम” हा जागतिकीकरणाचा पहिला हुंकार याच भूमीत उमटला हे सर्वमान्य सत्य असल्यामुळे सरसंघचालकांच्या मतांबाबत दुमत होण्याचे काहीच कारण नाही.

**देशातील अनेक राज्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा करीत वेगाने विकसित होत आहेत. त्यासाठी गुंतवणूक परिषद आयोजित करीत आहेत. उत्तर प्रदेश, ओडिशा, गुजरात यांसारखी राज्ये अर्थव्यवस्था आणि रोजगार वाढवण्याला प्रोत्साहन देत आहेत.**

# विदर्भावरील ‘मागासपणा’चा डाग

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील विदर्भात गुंतवणुकीच्या अनेक संधी आहेत.पंतप्रधानांच्या पाच लाख कोटी (पाच ट्रिलियन डॉलर्स ) अर्थव्यवस्थेच्या स्वप्नपूर्तीसाठी जास्तीत जास्त योगदान विदर्भ देऊ शकतो. विदर्भात औद्योगिकीकरणासाठी मोठ्या प्रमाणात संसाधने असल्याने उद्योग जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनतील. नवीन भांडवल निर्माण करण्यास मदत होऊ शकेल अशा विदर्भातील संसाधनांमध्ये मूल्यवर्धनाची प्रचंड क्षमता आहे. काही उदाहरणे पुढीलप्रमाणे.विदर्भातील लांब धाग्यासाठी आवश्यक असा उच्च दर्जाचा कापूस सध्या जगभरात निर्यात केला जातो. पंतप्रधान आणि निती आयोगाने देशात सात मेगा टेक्स्टाइल पार्कची घोषणा केली आहे. विदर्भातील अमरावती जिल्ह्याची क्षमता पाहता हा जिल्हा टेक्स्टाइल पार्कसाठी निवडला गेला आहे कारण तिथे २०० किमी परिसरात कापसाचे पीक घेतले जाते. पंतप्रधानांनी वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी फार्म-फायबर-फॅब्रिक-फॅशन-फॉरेक्स



हे ‘फाइव्ह एफ’चे सूत्र दिले आहे. विदर्भातील टेक्स्टाइल पार्कमधून जास्तीत जास्त फायदा मिळवता येईल. उर्वरित सहा टेक्स्टाइल पार्क इतर राज्यांमध्ये आहेत. वस्त्रोद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी निर्यातीसाठी १८० अब्ज डॉलरचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले आहे. विदर्भात देशातील सर्वात मोठया टेक्स्टाइल पार्कसाठी लागणारे सगळे काही आहे. उदा. बुटीबोरी येथील एक कोटी टनाचा पॉलिस्टर प्रकल्प, १८००० मेगावॅट वीज, सर्वोत्कृष्ट अभियंते, सर्वोत्तम निर्यातीसाठी पायाभूत सुविधा.. मागील दोन-तीन वर्षांपासून राज्य आणि केंद्र सरकारने गडचिरोली जिल्ह्यावर लक्ष केंद्रित केले आहे. जिल्ह्यात १२ दशलक्ष टन लोहखनिज खाण उत्पादन करण्याचे सरकारचे प्रयत्न आहेत. आता राज्य सरकार आणि खाण कंपनीने आठ-दहा दशलक्ष टन क्षमतेच्या एकात्मिक स्टील प्रकल्पाची स्थापना करण्यासाठी २० हजार कोटींचे सामंजस्य करार केले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीला भारतातील भावी स्टील सिटी म्हणून घोषित केले आहे. यासाठी गडचिरोलीपर्यंत विस्तारित रेल्वे नेटवर्क, समृद्धी द्रुतगती मार्ग उभारण्याचे नियोजन आहे. आणखी सहा-सात खाणपट्टे स्टील क्षेत्रातील प्रस्थापित कंपन्यांना देण्यात आले आहेत. त्या गडचिरोली जिल्ह्यात मोठया प्रमाणात गुंतवणूक करू शकतात. गडचिरोली जिल्ह्यात दोन मोठया सिमेंट कंपन्याही गुंतवणूक करत आहेत.भारत सरकार, पंतप्रधान कार्यालय आणि निती आयोग ‘सक्र्युलर इकॉनॉमी’ला चालना देण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यातून मूळ संसाधनांचे जतन आणि टाकाऊ घटकांचे संपत्तीत रूपांतर करणे शक्य आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**सामाजिक कार्यासाठी पैसे** वडेट्टीवारांकडून लक्ष्मण हाकेंची पाठराखण

# पैशांशिवाय आंदोलनं होतात का?

## मी बँक खात्यावर पैस घेत नाही



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांची फोनवरील संभाषणाची एक ऑडिओ क्लिप सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. यामध्ये एका तरुणाने हाके यांना त्यांच्या सामाजिक कार्यात योगदान म्हणून पैसे देऊ केले. लक्ष्मण हाके यांनी देखील ते पैसे स्वीकारण्यास सहमती दर्शवली. ते म्हणाले. “मी बँक खात्यावर पैस घेत नाही. मुळात माझ्याकडे बँक खातं नाही. मी यूपीआय वापरत नाही. तसेच हाके यांनी पैसे देऊ करणाऱ्या तरुणाला त्यांच्या कार चालकाचा यूपीआय लिंक्ड फोन नंबर देऊ केला आणि त्या नंबरवर पैसे पाठवण्यास सुचवलं. यावर तरुणाने हाके यांना शिवीगाळ केली.**

लक्ष्मण हाके त्या तरुणाला म्हणाले, “मी दिलेल्या यूपीआय नंबरवर तुम्ही पैसे पाठवू शकता. कारण हा आपल्या मित्राचाच नंबर आहे. किती रुपये पाठवताय?” यावर तरुणाने लक्ष्मण हाके यांना शिवीगाळ केली आणि ‘सामाजिक कार्याच्या नावाखाली पैसे घेताना लाज कशी वाटत नाही?’ असा प्रश्न विचारला. या फोन कॉलचं रेकॉर्डिंग सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. यावर हाके यांनी काही वेळापूर्वी खुलासा केला. ते म्हणाले, “माझ्या हेतूवर प्रश्न उपस्थित करण्यापेक्षा ज्याने मला फोन केला होता त्याचा हेतू पाहा. केवळ मला व माझ्या आंदोलनाला बदनाम करण्यासाठी तो कॉल आला होता आणि त्याचं रेकॉर्डिंग व्हायरल केलं गेलं.”दरम्यान, पैशांशिवाय आंदोलनं होतात का? असा प्रश्न उपस्थित करत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी लक्ष्मण हाके यांची पाठराखण केली आहे. तसेच आतापर्यंत इतकी आंदोलनं झाली आहेत ती पैशांशिवाय झाली आहेत का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला आहेविजय वडेट्टीवार म्हणाले, “एक ओबीसी कार्यकर्ता, नेता राज्यभर फिरतोय. लक्ष्मण हाके या तरुणाला सगळीकडे सभेसाठी बोलावलं जात आहे. एखादा कार्यकर्ता समाजासाठी काम करत असतो तेव्हा लोकांना वाटतं की आण त्याला मदत करुया. एखादा माणूस म्हणतो की मला तुमची मदत करायची आहे. अशा वेळी कोण नाही म्हणणार? कोण मदत नाकारणार? मदत नाकारली नाही यात काय वाईट आहे? लक्ष्मण हाकेने पैसे मागितले का? त्याला समोरून ज्या नालायकाने फोन केला त्याच्या हेतूवर संशय घ्यायला हवा. त्या नालायकाने लक्ष्मण हाकेला बदनाम करण्याचं षडयंत्र रचलं आहे का? आतापर्यंती जी आंदोलनं झाली ती फुकट झाली आहेत का? एवढी आंदोलनं झाली त्यांनी पैसे घेतले नाहीत का? बाकीच्या लोकांनी पैशांशिवाय आंदोलनं केली का?लक्ष्मण हाके त्या तरुणाला म्हणाले, “मी दिलेल्या यूपीआय नंबरवर तुम्ही पैसे पाठवू शकता. कारण हा आपल्या मित्राचाच नंबर आहे. किती रुपये पाठवताय?” यावर तरुणाने लक्ष्मण हाके यांना शिवीगाळ केली आणि ‘सामाजिक कार्याच्या नावाखाली पैसे घेताना लाज कशी वाटत नाही?’ असा प्रश्न विचारला. या फोन कॉलचं रेकॉर्डिंग सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. यावर हाके यांनी काही वेळापूर्वी खुलासा केला. ते म्हणाले, “माझ्या हेतूवर प्रश्न उपस्थित करण्यापेक्षा ज्याने मला फोन केला होता त्याचा हेतू पाहा. केवळ मला व माझ्या आंदोलनाला बदनाम करण्यासाठी तो कॉल आला होता आणि त्याचं रेकॉर्डिंग व्हायरल केलं गेलं.”दरम्यान, पैशांशिवाय आंदोलनं होतात का? असा प्रश्न उपस्थित करत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी लक्ष्मण हाके यांची पाठराखण केली आहे. तसेच आतापर्यंत इतकी आंदोलनं झाली आहेत ती पैशांशिवाय झाली आहेत का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला आहेविजय वडेट्टीवार म्हणाले, “एक ओबीसी कार्यकर्ता, नेता राज्यभर फिरतोय. लक्ष्मण हाके या तरुणाला सगळीकडे सभेसाठी बोलावलं जात आहे.

### हाकेने पैसे मागितले का?

लोकांना वाटतं की आण त्याला मदत करुया. एखादा माणूस म्हणतो की मला तुमची मदत करायची आहे. अशा वेळी कोण नाही म्हणणार? कोण मदत नाकारणार? मदत नाकारली नाही यात काय वाईट आहे? लक्ष्मण हाकेने पैसे मागितले का? त्याला समोरून ज्या नालायकाने फोन केला त्याच्या हेतूवर संशय घ्यायला हवा. त्या नालायकाने लक्ष्मण हाकेला बदनाम करण्याचं षडयंत्र रचलं आहे का? आतापर्यंती जी आंदोलनं झाली ती फुकट झाली आहेत .

# सणासुदीच्या तोंडावर रेशन धारकांना दणका

## रत्नागिरी जिल्ह्यातील 16,185 रेशनकार्डधारकांचे वितरण बंद



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऐन सणासुदीच्या तोंडावरच रत्नागिरी जिल्हा प्रशासनाच्या पुरवठा विभागाने रेशन कार्ड धारकांना मोठा दणका दिला आहे. केवायसी न केलेल्या व सलग सहा महिने धान्याची उचल न करणा-या रेशन कार्डधारकांचे धान्य वितरण बंद करण्यात आले आहे. आता पर्यंत रत्नागिरी जिल्ह्यातील १६ हजार १८५ रेशनकार्डधारकांना याचा फटका बसला आहे.**

रत्नागिरी जिल्हा प्रशासनाच्या पुरवठा विभागाची ही प्रथमच केलेली मोठी कारवाई आहे. सलग सहा महिने रेशनवर धान्याची उचल न केल्यास शिधापत्रिका आपोआप निष्क्रिय झाल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. जिल्ह्यातील १६ हजार १८५ रेशनकार्डधारकांचे धान्य बंद करण्यात आले असून त्यामध्ये १४ हजार ३६ प्राधान्य गटातील तर २ हजार १४९ अंत्योदय गटातील रेशन कार्डधारकांचा समावेश आहे. सध्या रत्नागिरी जिल्ह्यात, नोंदणीकृत लाभार्थी आहेत. धान्य वितरण थांबविण्यात आलेल्या रेशन कार्डधारकांमध्ये मंडणगड तालुक्यातील ७९४, दापोली तालुक्यातील १ हजार ६९४,१ हजार २०९ तसेच राजापूर तालुक्यातील १ हजार ६६१ रेशन कार्डधारकांचे रेशन धान्य बंद करण्यात आले आहे.

### ई-केवायसी प्रक्रिया पुर्ण झाली नाही

याबरोबर रत्नागिरी जिल्ह्यातील तब्बल २ लाख ७८ हजार ३७६ लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रक्रिया अद्याप ही पुर्ण झालेली नाही. त्यामुळे अशा लोकांचे देखील रेशनवरील धान्य पुरवठा थांबण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.रत्नागिरी जिल्हा प्रशासनाच्या पुरवठा विभागाची ही प्रथमच केलेली मोठी कारवाई आहे. सलग सहा महिने रेशनवर धान्याची उचल न केल्यास शिधापत्रिका आपोआप निष्क्रिय झाल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. जिल्ह्यातील १६ हजार १८५ रेशनकार्डधारकांचे धान्य बंद करण्यात आले असून त्यामध्ये १४ हजार ३६ प्राधान्य गटातील तर २ हजार १४९ अंत्योदय गटातील रेशन कार्डधारकांचा समावेश आहे.

## आपणच विजेते आहोत

## भारतासोबत मुक्त व्यापार करार करायचे आहेत

# जग भारतीय प्रतिभेला घाबरतं!

## इन्स्टाग्रामवर व्हिडिओ शेअर

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या एच-१बी व्हिसा शुल्क १ लाख डॉलर्सपर्यंत वाढवण्याच्या निर्णयावर प्रतिक्रिया दिली. गोयल म्हणाले की, जग भारतीय प्रतिभेला थोडे घाबरते. इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडिओ क्लिपमध्ये गोयल म्हणाले की, जगभरातील विविध देशांना भारतासोबत मुक्त व्यापार करार करायचे आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, हे देश भारतासोबत व्यापार वाढवू इच्छितात आणि संबंध सुधारू इच्छितात.**



इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये पीयूष गोयल म्हणाले की, "ते आपल्या प्रतिभेला थोडे घाबरतात. पण, आम्हाला त्यावर काहीही आक्षेप नाही." पीयूष गोयल यांनी यावेळी भारतीयांना भारतातच नवोपक्रम आणि संशोधन क्षेत्रात काम करण्याचे आवाहन केले, कारण यामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळेल. "म्हणूनच काहीही झाले तरी, आपणच विजेते आहोत", असेही पीयूष गोयल यांनी नमूद केले.भारताच्या विकासाबद्दल बोलताना पियुष गोयल म्हणाले, "पहिल्या तिमाहीत आपण ७.८ टक्के विकास साध्य केला आहे. ते म्हणाले, "हे सर्व अर्थशास्त्रज्ञांच्या अपेक्षांपेक्षा जास्त आहे आणि आपण २०४७ पर्यंत त्यापेक्षा जास्त विकास करू."दरम्यन, डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी एच-१बी व्हिसा कार्यक्रमात सुधारणा करण्याच्या घोषणेवर स्वाक्षरी केली होती. ज्यामध्ये ट्रम्प प्रशासनाच्या म्हणण्यानुसार एच-१बी व्हिसा कार्यक्रमाचा गैरवापर रोखण्यासाठी एच-१बी व्हिसा अर्जाचे शुल्क १ लाख डॉलर्सपर्यंत वाढवण्यात आले आहे. व्हाईट हाऊसच्या मते, या बदलामुळे नवीन अर्जदारांना एच-१बी अर्जासह १ लाख डॉलर्स शुल द्यावे लागेल.दरम्यान, अमेरिकेच्या या निर्णयावर एक्सवर प्रतिक्रिया देताना निति आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत यांनी म्हटले की, "एच-१बी व्हिसासाठी दरवर्षी एक लाख डॉलर भरण्याच्या नियमाचा फटका अमेरिकी कंपन्यांनाही बसेल आणि त्याचा भारताला लाभ होईल. या निर्णयामुळे अमेरिकेत जाऊन उत्तम कारकीर्द घडवण्याची स्वप्ने पाहणारे आता बंगळुरू, हैदराबाद आणि पुणे या शहरांमध्ये काम करतील. त्यामुळे यापुढे या शहरांमधून पेटंटसाठी अर्जांची संख्या वाढेल."दुसरीकडे, प्रत्येक एच-१बी व्हिसा अर्जावर वार्षिक १ लाख डॉलर्स शुल्क आकारण्याच्या अमेरिकेच्या निर्णयाचा, तिथे काम करणाऱ्या भारतीय इजिनिअर्स आणि आयटी कंपन्यांवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता नॅसकॉमने व्यक्त केली आहे. "जागतिक आणि भारतीय कंपन्यांसाठी एच-१बी व्हिसावर काम करत असलेल्या भारतीयांवर आणि भारतातील तंत्रज्ञान सेवा कंपन्यांवरही याचा परिणाम होईल", असे नॅसकॉमने एका निवेदनात म्हटले आहे.इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये पीयूष गोयल म्हणाले की, "ते आपल्या प्रतिभेला थोडे घाबरतात. पण, आम्हाला त्यावर काहीही आक्षेप नाही." पीयूष गोयल यांनी यावेळी भारतीयांना भारतातच नवोपक्रम आणि संशोधन क्षेत्रात काम करण्याचे आवाहन केले, कारण यामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळेल. "म्हणूनच काहीही झाले तरी, आपणच विजेते आहोत", असेही पीयूष गोयल यांनी नमूद केले.भारताच्या विकासाबद्दल बोलताना पियुष गोयल म्हणाले, "पहिल्या तिमाहीत आपण ७.८ टक्के विकास साध्य केला आहे. ते म्हणाले, "हे सर्व अर्थशास्त्रज्ञांच्या अपेक्षांपेक्षा जास्त आहे आणि आपण २०४७ पर्यंत त्यापेक्षा जास्त विकास करू."दरम्यन, डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी एच-१बी व्हिसा कार्यक्रमात सुधारणा करण्याच्या घोषणेवर स्वाक्षरी केली होती. ज्यामध्ये ट्रम्प प्रशासनाच्या म्हणण्यानुसार एच-१बी व्हिसा कार्यक्रमाचा गैरवापर रोखण्यासाठी एच-१बी व्हिसा अर्जाचे शुल्क १ लाख डॉलर्सपर्यंत वाढवण्यात आले आहे. व्हाईट हाऊसच्या मते, या बदलामुळे नवीन अर्जदारांना एच-१बी अर्जासह १ लाख डॉलर्स शुल द्यावे लागेल.

### भारताला या निर्णयाचा लाभ

अमेरिकेच्या या निर्णयावर एक्सवर प्रतिक्रिया देताना निति आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत यांनी म्हटले की, "एच-१बी व्हिसासाठी दरवर्षी एक लाख डॉलर भरण्याच्या नियमाचा फटका अमेरिकी कंपन्यांनाही बसेल आणि त्याचा भारताला लाभ होईल. या निर्णयामुळे अमेरिकेत जाऊन उत्तम कारकीर्द घडवण्याची स्वप्ने पाहणारे आता बंगळुरू, हैदराबाद आणि पुणे या शहरांमध्ये काम करतील.

# आपल्या घराला स्वदेशीचे प्रतीक बनवले पाहिजे

## खिशातील कंगव्याचे उदाहरण देत पंतप्रधानांनी दिला स्वदेशीचा नारा

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जीएसटी सूसुत्रीकरणानंतर उद्यापासून देशभरात जीएसटी २.० लागू होत आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित केले. यावेळी पंतप्रधानांनी देशातील कर व्यवस्था, जीएसटीमधील बदल आणि भारतीयांनी स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देण्यावर भाष्य केले.**



यावेळी पंतप्रधानांनी खिशातील कंगव्याचे उदाहरण देत म्हटले की, "आज, नकळत अनेक परदेशी वस्तू आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनल्या आहेत. आपल्या खिशातील कंगवा भारतीय आहे की परदेशी हे सुद्धा आपल्याला माहित नसते. आता आपण यापासून मुक्त झाले पाहिजे. आपल्या देशातील मुला-मुलींनी कष्टाने बनवलेल्या वस्तू आपण खरेदी केल्या पाहिजेत. आपण आपल्या घराला स्वदेशीचे प्रतीक बनवले पाहिजे."पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, "आपल्याला मेड इन इंडिया असलेले सामान विकत घ्यायचे आहे. आम्ही स्वदेशी सामान विकत घेतो, हे गर्वाने सांगा. आम्ही स्वदेशी उत्पादन विकत घेतो, हेही अभिमानाने सांगा. प्रत्येक भारतीयाने याचा गर्व बाळगला पाहिजे. जेव्हा सर्व हे पाळतील तेव्हा भारताचा वेगाने विकास होईल."तत्पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की,, "उद्यापासून देशात 'जीएसटी बचत महोत्सव' सुरू होत आहे. तुमची बचत वाढेल आणि तुम्ही तुम्हाला हव्या असलेल्या वस्तू खरेदी करू शकाल. 'जीएसटी बचत महोत्सव'चा समाजातील सर्व घटकांना फायदा होईल. या सणाचा काळ सर्वांसाठी गोडवा घेऊन येईल.

### विविध करांच्या जाळ्यात अडकले

मी देशभरातील लाखो कुटुंबांना पुढील पिढीतील जीएसटी सुधारणा आणि 'बचत महोत्सवा'साठी मनापासून आणि शुभेच्छा देतो.""जेव्हा भारताने २०१७ मध्ये जीएसटी सुधारणा सुरू केली, तेव्हा ती इतिहासातील एका वळणाची आणि एका नवीन कराची निर्मितीची सुरुवात होती. अनेक दशकांपासून, आपले लोक आणि आपल्या देशातील व्यवसाय विविध करांच्या जाळ्यात अडकले होते", असेही त्यांनी म्हटले.

# जुही चावलाची लेक दिसते फारच सुंदर

आपलं सौंदर्य आणि दमदार अभिनयाने ९० च्या दशकात प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे जुही चावला होय. जुहीने आपल्या करिअरमध्ये एकापेक्षा एक अनेक सुपरहिट चित्रपट दिले. आता ती फारसे चित्रपट करत नसली तरी सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. जुहीने उद्योगपती जय मेहता यांच्याशी लग्न केलंय. जय व जुही यांना जान्हवी व अर्जुन नावाची दोन अपत्ये आहे. जुहीची लेक जान्हवी २३ वर्षांची आहे. आई अभिनेत्री असली तरी जान्हवीला मात्र अभिनय क्षेत्रात करिअर करायचं नाही. जान्हवी मेहता अभ्यासात प्रचंड हुशार असून तिने मे २०२३ मध्ये कोलंबिया विद्यापीठातून ग्रॅज्युएशन पूर्ण केलंय. जान्हवीला अभिनेत्री व्हायचं नाही. तिला क्रिकेटची खूप आवड आहे आणि तिला लेखिका व्हायचं आहे. तसेच जान्हवीला पुस्तकं वाचायला खूप आवडतं, असं तिच्या आईने सांगितलं होतं.जुही चावलाने न्यूज १८ ला दिलेल्या मुलाखतीदरम्यान सांगितलं होतं की, बॉलीवूडमध्ये काहीतरी मोठं करण्याची स्पर्धा स्टार किड्समध्ये सुरू असताना दुसरीकडे तिची मुलगी जान्हवी मेहताला लाइमलाइटपासून दूर राहायला आवडतं. "स्वतःच्या मुलांचे कौतुक करू नये, पण ती एक हुशार मुलगी आहे आणि तिचा शैक्षणिक रेकॉर्डही खूप चांगला आहे. इंटरनॅशनल जनरल सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशनमध्ये तिने जबरदस्त कामगिरी केली आहे. तिने हिस्ट्री इन इंडियामध्ये अव्वल स्थान पटकावले होते. ती त्याच्या शाळेत पहिली आली होती, असं जुही चावला म्हणाली होती. याशिवाय जुही चावलाने खुलासा केला होता की तिची मुलगी जान्हवी मेहताला क्रिकेट खूप आवडतं. "जेव्हा जान्हवी क्रिकेट आणि खेळाडूंबद्दल बोलते तेव्हा तिच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसतो. कधी कधी मला प्रश्न पडतो की हे सर्व ज्ञान कुठून येतं. मलाही खूप आश्चर्य वाटतं, पण तिने हे स्वतःसाठी निवडलं आहे, त्यामुळे मी त्याचे श्रेय घेऊ शकत नाही," असं जुहीने सांगितलं होतं.जुही चावला पुढे म्हणाली, "ती (जान्हवी मेहता) त्या स्टार किड्सपेक्षा वेगळी आहे ज्यांना पडद्यावर स्वत:ला अभिनेता किंवा अभिनेत्री म्हणून बघायचं आहे.

# करीना कपूरला बेबो हे नाव कोणी दिलं



करीना कपूर बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आजवर तिने अनेक चित्रपटांत विविध भूमिका साकारत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. करीनाला इंडस्ट्रीत बेबो या नावानेही ओळखलं जातं. पण; तुम्हाला माहीत आहे का? तिला हे नाव कोणी दिलं आणि यामागे काय कारण आहे? करीना कपूरचा आज ४५ वा वाढदिवस आहे. यानिमित्त तिला बेबो हे नाव कोणी दिलं, यामागे काय कारण आहे जाणून घेऊयात. कपूर कुटुंबात प्रत्येकाला काही ना काही निकनेम आहे. रणधीर कपूर यांच्यापासून ते ऋषी कपूर यांच्या पर्यंत प्रत्येकाला त्यांच्या मूळ नावाबरोबर एक निकनेमही आहे. ऋषी कपूर यांना चिंटू, करिश्मा कपूरचं लोलो अशी नावं आहेत. तसंच करीना कपूरलाही बेबो या नावाने ओळखलं जातं.अभिनेत्री करिश्मा कपूरने बहिणीच्या या नावाबद्दल खुलासा केलेला. तिचं हे नाव कसं ठेवण्यात आहे याबद्दल 'इंडियन आयडॉल'१५मध्ये सांगितलेलं. ती म्हणालेली, त्यांचे वडील रणधीर कपूर यांनी हे नाव ठेवलेलं. जेव्हा करीनाचा जन्म झालेला. त्यावेळी त्यांना छोटं पण गोड असं नाव हवं होतं म्हणून त्यांनी बेबो हे नाव सुचवलं आणि पुढे ते इकतं प्रसिद्ध झालं की, मित्र-मैत्रिणी, कुटुंबीय, चाहते, मीडियातील लोक सगळेच तिला बेबो म्हणू लागले.करीनाप्रमाणे करिश्माच्या लोलो या निकनेममागेही एक कास कारण आहे. करिश्माला लोलो म्हणतात कारण हे नाव तिच्या आईने ठेवलं आहे. लोलो हे नाव एका हॉलीवूड अभिनेत्रीच्या नावावरुन ठेवण्यात आलेलं. जीना लोलोब्रिगिडीया या हॉलीवूड अभिनेत्रीच्या नावावरुन लोलो हे नाव ठेवण्यात आलेलं.

# अबू सालेमच्या आवाजाच्या प्रेमात

बॉलीवूडमधील एक अभिनेत्री जिच्या सौंदर्याने चाहत्यांना अक्षरशः वेड लावलं होतं. या अभिनेत्रीला प्रेम करणं इतकं महागात पडलं की तिचं करिअरच संपलं. ही अभिनेत्री अंडरवर्ल्ड डॉन अबू सालेमच्या प्रेमात पडली आणि त्याचे दुष्परिणाम तिला भोगावे लागले. तिला तुरुंगातही जावं लागलं. ही अभिनेत्री म्हणजे मोनिका बेदी होय. आज मोनिकाचा वाढदिवस आहे, त्यानिमित्ताने तिने एका मुलाखतीत तिच्या वादग्रस्त लव्ह लाइफबद्दल काय म्हटलं होतं, ते जाणून घेऊयात.'ताजमहल' या तेलुगू चित्रपटातून आपल्या करिअरची सुरुवात करणारी मोनिका दिसायला खूपच सुंदर होती. तिच्या सौंदर्याने प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं होतं. तिने बॉलीवूडसह दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये काम केलं.

# आलियाची परवानगी का?



या सिनेमाने छप्परफाड कमाई केली. अनेकांनी या सिनेमावर टीकाही केली तर काही जणांनी या सिनेमाची स्तुती केली. सिनेमाने कोट्यवधी रुपये कमवले आहेत. सिनेमात ॲक्शन सीन आणि इंटिमेट सीनही आहेत. रणबीर कपूर आणि तृप्ती डिमरी यांच्या इंटीमेट सीनची चर्चाही झाली. या इंटीमेट सीनसाठी आलिया भटने परवानगी दिली होती का? यावर रणबीर कपूरने उत्तर दिलं आहे.आहे. जनसत्तानं याबाबत अधिकृतरीत्या माहिती देणारे वृत्त दिले आहे.ॲनिमल या सिनेमात रणबीर कपूर, रश्मिका मंदाना आणि तृप्ती डिमरी यांच्या भूमिका आहेत. तृप्ती डिमरी आणि रणबीर कपूर या दोघांचे इंटीमेट सीन चर्चेत आले होते. भाभी २ हे सिनेमातलं तिचं नाव ट्रेंडमध्येही आलं होतं. या सीनच्या चित्रिकरणाच्या वेळी पाचच लोक उपस्थित होते. मात्र रणबीरने याबाबत जे भाष्य केलं आहे त्यामुळे या सीनची आणि सिनेमाची आठवण अनेकांना झाली आहे. तृप्ती डिमरीबरोबरच्या सीनसाठी आलियाची परवानगी घेतली होती का? यावर रणबीर कपूर म्हणाला, "मी खरंतर हा सीन करताना थोडा घाबरलो होतो. पण आलियाने पत्नी म्हणून मला सपोर्ट केला. आम्ही दोघंही एकमेकांच्या कामाबाबत ॲनिमलच्या शूटिंग दरम्यान तृप्ती डिमरीसह इंटीमेट सीनबाबत मी सांगितलं होतं.

# सचिन पिळगावकर यांच्या 'नवरा माझा नवसाचा २'ला 2 वर्षं पूर्ण!

'नवरा माझा नवसाचा' हा मराठीतील गाजलेल्या चित्रपटांपैकी एक आहे. हल्ली अनेक गाजलेल्या जुन्या चित्रपटांचे रिमेक तसेच सिक्वल बनताना दिसतात. गेल्या वर्षी सचिन पिळगावकर यांच्या 'नवरा माझा नवसाचा' या चित्रपटाचाही दुसरा भाग प्रदर्शित झालेला. अशातच आता या चित्रपटाला प्रदर्शित होऊन 2 वर्ष पूर्ण झाली आहेत. 'नवरा माझा नवसाचा' चित्रपटात अभिनेते सचिन पिळगावकर व सुप्रिया पिळगावकर यांनी मुख्य भूमिका साकारलेल्या तर 'नवरा माझा नवसाचा २'मध्ये त्यांच्याबरोबर अभिनेता स्वप्नील जोशी व अभिनेत्री हेमल इंगळेसुद्धा महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकलेले. अशातच आता चित्रपटाला प्रदर्शित होऊन 2 वर्ष झाल्यानिमित्त हेमलने भावुक पोस्ट शेअर केली आहे.हेमलने 'नवरा माझा नवसाचा २'च्या चित्रीकरणावेळीचे काही खास फोटो शेअर करत त्यांना कॅप्शन दिली आहे. यावेळी तिने म्हटलं









की, ""नवरा माझा नवसाचा २' ला एक वर्ष पूर्ण झालं, माझ्या मराठी ब्लॉकबस्टर चित्रपटाला 2 वर्ष झालं आहेत. श्रद्धा हे पात्र साकारुन एक वर्ष झालं, या सर्व दिग्गज मंडळींबरोबर काम करुन एक वर्ष झालं. सगळ्यासाठी खूप कृतज्ञ आहे."सचिन पिळगावकर दिग्दर्शित 'नवरा माझा नवसाचा २' हा चित्रपट २० सप्टेंबर २०२४ मध्ये प्रदर्शित झालेला. काल शनीवारी या चित्रपटाला प्रदर्शित होऊन एक वर्ष पूर्ण झाली आहेत. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरही चांगली कमाई केलेली. चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षकांनी चित्रपटगृहात मोठ्या संख्येने गर्दी केलेली. माध्यमांच्या माहितीनुसार या चित्रपटाने जवळपास २०-२५ कोटींचा गल्ला जमावलेला.'नवरा माझा नवसाचा २' हा हेमलच्या करिअरमधील सर्वाधिक कमाई केलेल्या चित्रपटांपैकी एक आहे. अभिनेत्रीने याबद्दल शेअर केलेल्या पोस्टमधून म्हटलं आहे. यावेळी तिने सचिन पिळगावकर, सुप्रिया पिळगावकर, अशोक सराफ, स्वप्नील जोशी, यांच्याबरोबरचे खास फोटो शेअर केले आहेत.दरम्यान, हेमलने यापूर्वी 'अशी ही आशिकी', 'उनाड', 'नवरा माझा नवसाचा २', 'पक्या पिंकी आणि साहेब', 'हार्दिक शुभेच्छा' यांसारख्या चित्रपटांत मुख्य नायिकेची भूमिका साकारली आहे.

आशिया कप - 2025

## अभिषेक-शुबमनच्या जोडीने चोपून काढलं

# भारताचा पाकिस्तानवर दमदार विजय!

## भारतीय संघाचा या स्पर्धेत पाकिस्तानविरूद्ध खेळताना सलग दुसरा विजय

।दुबई।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघ टी-२० वर्ल्ड चॅम्पियन का आहे, हे भारताच्या युवा खेळाडूंनी पुन्हा एकदा दाखवून दिलं आहे. आशिया चषकातील सुपर ४ फेरीतील दुसरा सामना भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये पार पडला. दुबईतील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यातही भारतीय संघ पाकिस्तानवर भारी पडला. याआधी झालेल्या साखळी फेरीतील सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानवर एकतर्फी धुव्वा उडवला होता. आता सुपर ४ फेरीतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानला दणका देत ६ गडी राखून दमदार विजयाची नोंद केली आहे.**






या सामन्याची सुरूवातही नो हँडशेकने झाली. गेल्या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने पाकिस्तानच्या कर्णधारासोबत हस्तांदोलन करणं टाळलं होतं. यावेळी सूर्याने पाकिस्तानच्या कर्णधाराकडे पाहिलं सुद्धा नाही. भारताने पाकिस्तानला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने २० षटकांअखेर ५ गडी बाद १७१ धावा करत भारतीय संघाला १७२ धावांचं आव्हान दिलं.

### भारतीय संघाची दमदार सुरूवात

भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी १७२ धावा करायच्या होत्या. भारतीय संघाचा मजबूत फलंदाजीक्रम पाहता हे आव्हान भारतीय संघासाठी फार मोठं नव्हतं. भारतीय संघाकडून अभिषेक शर्मा आणि शुबमन गिलची जोडी डावाची सुरूवात करण्यासाठी मैदानात आली. अभिषेकने शाहीन आफ्रिदीच्या पहिल्याच चेंडूवर खणखणीत षटकार ठोकून भारतीय संघाला दमदार सुरूवात करून दिली. त्याला गिलची चांगली साथ मिळाली.

दोघांनी मिळून ९ व्या षटकात भारतीय संघाला १०० धावांचा पल्ला गाठून दिला. अभिषेकने २४ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. गिलला देखील आपलं अर्धशतक झळकावण्याची संधी होती. पण तो ४७ धावांवर तंबूत परतला. त्यानंतर अभिषेक शर्मा देखील ७४ धावा करून माघारी परतला.ही जोडी बाद झाल्यानंतर सूर्यकुमार यादव शून्यावर बाद झाला. संजू सॅमसनने १३ धावांची खेळी केली. शेवटी तिलक वर्मा आणि हार्दिक पंड्याने मिळून भारतीय संघाला विजय मिळवून दिला.

भारतीय संघाने नाणेफेक जिंकून पाकिस्तानला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. पाकिस्तानकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या साहिबजादा फरहानने ४५ चेंडूंचा सामना करत ५८ धावांची खेळी केली. तर फखर जमानने १५ धावांची खेळी केली. सईम अयुबने २१, हुसेन तलतने १० आणि मोहम्मद नवाजने २१ धावांची खेळी केली. शेवटी सलमान अली आगाने नाबाद १७ आणि फहिम अशरफने नाबाद २० धावांची खेळी करून पाकिस्तानला २० षटकांअखे १७१ धावांवर पोहोचवलं.

# बॅट हवेत उडाली अन् भारताला विकेट मिळाली!

## गेमचेंजर दुबेच्या जबरदस्त चेंडूवर असा बाद झाला फरहान

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताविरूद्ध सुपर फोर सामन्यात पाकिस्तानचा संघ चांगल्या तयारीनिशी उतरला, याचा प्रत्यय पाकिस्तानचा सलामीवीर आणि इतर फलंदाजांनी दिला. याशिवाय भारतीय संघाने पॉवरप्लेमध्ये दोन झेल सोडले. पण भारताच्या गोलंदाजांनी सातत्याने भेदक गोलंदाजी करत सलामीवीर फरहानला झेलबाद केलं. गेमचेंजर ठरलेल्या शिवम दुबेच्या गोलंदाजीवर बॅट हवेत उडाली आणि त्याने आपली विकेट गमावली.**




भारताने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पाकिस्तानच्या सलामीवीरांनी चांगली सुरूवात केली पण फखर जमान लवकर झेलबाद झाला. संजूने टिपलेल्या फखरच्या झेलवरून देखील गदारोळ सुरू आहे. तर दुसरा सलामीवीर फरहानने अर्धशतकी खेळी करत संघाचा डाव सावरला. त्याने सईम अयुबसह ७० अधिक धावांची भागीदारी रचली.साहिबजादा फरहान ४५ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकारांसह ५८ धावा केल्यानंतर बाद झाला. तर भारताकडून शिवम दुबेने उत्कृष्ट गोलंदाजी करत आधी सईम अयुबला माघारी धाडलं आणि त्यानंतर स्पेलमधील पुढील षटकात फरहानला झेलबाद केलं. शिवम दुबेच्या चेंडूवर फरहान मोठा फटका खेळण्यासाठी गेला आणि त्याची बॅट हवेत उडाली, त्यासह चेंडू उंच हवेत गेला. चेंडू हवेत जाताच कर्णधार सूर्यादादाच्या दिशेने गेला आणि त्याने कोणतीही चूक न करता कमालीचा झेल टिपला.

### शिवम दुबे गेमचेंजर ठरला

साहिबजादा फरहानचे पॉवरप्लेमध्ये दोन वेळा झेल सुटले आणि याचा त्याने फायदा घेत अर्धशतकी खेळी करत मोठी खेळी रचली. त्याच्या अर्धशतकाच्या जोरावर पाकिस्तानने पहिल्या डावात भारताविरूद्ध ५ बाद १७१ धावांची खेळी केली. पाकिस्तानच्या सर्व फलंदाजांनी चांगली फलंदाजी केली, ज्यामुळे त्यांना भारताविरूद्ध चांगली कामगिरी करता आली.

### अभिषेक शर्माचा पारा चढला

आपल्या षटकाचा अखेरचा चेंडू झाल्यावर हारिस हा गिलला अपशब्द वापरत होता. त्यावेळी अभिषेक शर्माचा पारा चांगलाच चढला. यावेळी अभिषेक हारिसच्या अंगावरच धावून गेला. आपल्या हाताने अभिषेक हा रौफला काही तर दाखवत होता. हारिसही यावेळी आक्रमक झाला आणि भर मैदानात जोरदार राडा झाल्याचे पाहायला मिळाले. हारिस आणि अभिषेक यावेळी एकमेकांना भिडत होते. आता मैदानात काही तरी होणार, असे वाटत होते. कारण अभिषेक यावेळी चांगलाच रागावलेला दिसत होता. आता पुढे काय होणार, हा प्रश्न सर्वांनाच पडला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। सोमवार ।

। दि. 22 सप्टेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## कचऱ्याचे संकलन करून त्यावर प्रक्रिया

# कचऱ्यापासून खतनिर्मितीचा दापोडीतील शून्य कचरा प्रकल्प!

### पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पुढाकारातून पर्यावरणपूरक जीवनशैलीला चालना

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**'पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पुढाकारातून उभारण्यात आलेला दापोडी शून्य कचरा प्रकल्प हा केवळ स्वच्छतेपुरता मर्यादित नसून महिलांचे सबलीकरण, रोजगारनिर्मिती आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांचा संगम ठरत आहे. या प्रकल्पासाठी दररोज कचऱ्याचे संकलन करून त्यावर प्रक्रिया करून खतनिर्मिती करण्यात येत आहे..**

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली आरोग्य विभागाच्या अंतर्गत हा ~~प्रकल्प महिला बचत गटाच्या~~ माध्यमातून चालवण्यात येत आहे. घरगुती कचऱ्याचे संकलन केल्यानंतर तो वर्गीकृत करून त्याद्वारे खतनिर्मिती करण्याची प्रक्रिया करणाऱ्या महिलांच्या आरोग्याची काळजी येथे व्यवस्थित घेतली जात आहे. या महिलांना आरोग्याच्या दृष्टिने आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

दापोडी येथील शून्य कचरा प्रकल्प वैष्णवी महिला बचत गटाच्या माध्यमातून चालवला जातो. प्रकल्पासाठी दररोज ४२८ घरांतील कचऱ्याचे संकलन केले जाते. त्यानंतर या कचऱ्याचे ओला व सुका असे वर्गीकरण करण्यात येते. या कचऱ्यापासून खतनिर्मितीसाठी त्यावर धूळ झटकण्याची मशीन, ॲग्लोमीटर मशीन, हायड्रॉलिक प्रेस मशीन, सेमी ऑटोमॅटिक खत मशीन आदीच्या मदतीने प्रक्रिया करण्यात येते. प्रक्रियेनंतर तयार होणारे सेंद्रिय खत शेतीसाठी उपयुक्त ठरत आहे.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

* ओला-सुका कचऱ्याचे विलगीकरण व पुनर्वापर प्रक्रिया
* कचऱ्यापासून खतनिर्मितीसाठी अत्याधुनिक साधनसामग्रीचा करण्यात येतो वापर
* कचऱ्याचे प्रमाण कमी होऊन पर्यावरणपूरक जीवनशैलीला चालना
* संपूर्ण प्रकल्प महिला बचत गटाच्या माध्यमातून चालवला जातो.
* महिलांना समाजात नवी ओळख मिळवून देण्यासाठी उपयुक्त प्रकल्प.

> “ दापोडी शून्य कचरा प्रकल्प हा केवळ कचरा व्यवस्थापनापुरता मर्यादित नाही, तर तो महिलांच्या सबलीकरणाचा व पर्यावरणपूरक जीवनशैलीचा उत्तम नमुना आहे. महापालिकेच्या माध्यमातून या प्रकल्पामुळे महिलांना रोजगार मिळत असून शहरातील कचरा व्यवस्थापनाची एक नवी दिशा निर्माण झाली आहे.
> **-विजयकुमार खोराटे,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> “ दापोडी शून्य कचरा प्रकल्पामध्ये आम्ही केवळ कचरा संकलनापुरते मर्यादित न राहता त्याच्या शास्त्रशुद्ध प्रक्रियेसह उच्च तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. महिलांच्या माध्यमातून चालणारा हा उपक्रम भविष्यातील शाश्वत कचरा व्यवस्थापनासाठी एक मॉडेल ठरेल.
> **--सचिन पवार,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

---

## पाणीपट्टी, थकीत मालमत्ता कराची 5 कोटी वसूल

### 3,424 प्रकरणे निकाली; ऑनलाइन भरणाऱ्यांना 4% सवलतीचा लाभ

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्याद्वारे आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतमध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपट्टी आणि मालमत्ता कराची 5 कोटींची थकबाकी वसूल झाली आहे.**




राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष व आकुर्डी दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश यांच्या मार्गदर्शनाखाली ही लोकअदालत पार पडली आहे. महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत पाणीपट्टी व मालमत्ता कर थकबाकीदारांना ऑनलाइन नोटिसा पाठवल्या होत्या. लोकअदालतीमध्ये पाणीपट्टी आणि मालमत्ता कराशी संबंधित एकूण 3 हजार 424 प्रकरणे निकाली घिाली. यामाध्यमातून तब्बल 5 कोटी 14 लाख 160 रुपयांचा महसूल संकलित झाला आहे. या लोकअदालतीकरिता नोटिसा पाठवलेल्या मालमत्ताधारकांनी थकबाकीसह चालू वर्षाचा मालमत्ता कराचा भरणा केला आहे. तसेच ज्या मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरूपात मालमत्ता कराचा भरणा केला आहे, त्यांना चालू वर्षाच्या सामान्य करावरील चार टक्के सवलतीचा लाभ मिळाला आहे. यामध्ये 2 हजार 481 पाणीपट्टी थकबाकीदारांकडून 3 कोटी 14 लाख 19 हजार रुपयांचा कर वसूल झाला आहे. तर 943 मालमत्ता कर थकबाकीदारांकडून 2 कोटी 2 हजार रुपयांचा मालमत्ता कर संकलित झाला आहे.

## शिक्षण विश्व: पीसीईटी शैक्षणिक संकुलात नवव्या 'आयसीसीयुबीईए

# तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अनेक संधी - प्रा. राव तुमाला

## 25' आणि चौथ्या 'आयमेस-25' आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**दहा पंधरा वर्षांत भारताने विज्ञान - तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने विकास केला आहे. नवकल्पना, निर्मिती, उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्तेचा खुबीने वापर केला जात आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत, असे प्रतिपादन मायक्रो इलेक्ट्रॉनिक पॅकिंग इनोव्हेशन्सचे पुरस्कर्ते प्रा. राव तुमाला यांनी केले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित निगडी येथील शैक्षणिक संकुलातील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे नवव्या 'आयसीसीयुबीईए-२५' आणि चौथ्या 'आयमेस-२५' या दोन आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. ही परिषद दोन दिवसांची असून 'संगणन, संप्रेषण, नियंत्रण आणि ऑटोमेशन' तसेच 'यांत्रिक अभियांत्रिकी मधील नवकल्पना' या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सादरीकरण, चर्चा होणार आहे. याप्रसंगी प्रा. तुमाला यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी आयईईईचे पुणे विभागीय प्रमुख डॉ. अमर बुचडे, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. नीलकंठ चोपडे, 'आयसीसीयुबीईए-२५' जनरल चेअर डॉ. जयश्री कट्टी, 'आयमेस-२५'जनरल चेअर डॉ. नरेंद्र देवरे आदी उपस्थित होते.

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने समाजाला चांगल्या सेवा मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी नवकल्पना, संशोधनाला चालना मिळावी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संवाद साधला पाहिजे, या हेतूने आयईईई काम करत आहे. पीसीसीओई मध्ये आज होत असलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये संगणन, संप्रेषण, ऑटोमेशन तसेच यांत्रिक अभियांत्रिकी'चे विषय निवडण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना भविष्यात याचा मोठा फायदा होईल, असे मत डॉ. अमर बुचडे यांनी व्यक्त केले.

या परिषदेसाठी देशासह सोळा देशांमधून बाराशे चाळीस प्रवेशिका आल्या. त्यामधून २१४ शोध निबंधांची निवड करून त्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे, असे डॉ. जयश्री कट्टी यांनी सांगितले. 'आयमेस' साठी २६० प्रवेशिकां मधून १२० शोध निबंधांची निवड करण्यात आली, असे डॉ. नरेंद्र देवरे यांनी सांगितले.

डॉ. गोविंद कुलकर्णी म्हणाले, की संशोधकांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन देऊन व्यासपीठ मिळवून देण्यासाठी; तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधकांशी ओळख होण्यासाठी ही परिषद उपयुक्त आहे.


यावेळी परिषदे विषयी माहिती असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. या परिषदेसाठी विविध देशांतील प्रतिनिधी, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. अंजली श्रीवास्तव, डॉ. संदीप पाटील यांनी केले. आभार डॉ. स्वाती जगताप यांनी मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करून परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या.

# मोहननगर परिसरात वारंवार वीज खंडित

## नागरिक संतप्त; भोसरी विभागीय कार्यालय महावितरणला निवेदन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**

मोहननगर परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. याविरोधात नागरी हक्क कृती समितीच्या वतीने भोसरी विभागीय कार्यालय महावितरणला निवेदन दिले आहे. महावितरणचा गलथान आणि नियोजनशून्य कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली. मोहननगरमधील वीज प्रश्नाबाबत शिष्टमंडळाने भोसरीचे उपअभियंता एस. एस. क्षीरसागर यांना निवेदन दिले. त्यावेळी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, संजय जगताप, माधव निर्लेकर, महेश पंडित आदी उपस्थित होते. कार्यकारी अभियंता अतुल देवकर यांच्याशीही चर्चा झाली. मोहननगरमधील विद्युत रोहित्रावर भार अधिक असल्यामुळे उच्च दाब वाहिनीवर ताण येतो आणि त्यामुळे वारंवार समस्या येत आहेत. मोहननगर परिसरात वीजपुरवठा सतत खंडित होत आहे. विद्युत रोहित्राच्या जागेवर झाड, झुडपे आणि गवत वाढलेले आहे. या परिसराचा समावेश भोसरी विभागात नवीन जोडल्यामुळे कर्मचाऱ्यांची आणि शिडी गाडीची संख्या अपुरी आहे, ज्यामुळे कर्मचारी वेळेवर पोहोचू शकत नाहीत. लघुदाब वाहिनी (एलटी) व फीडर बॉक्स यांचा सर्व्हे करण्याची गरज आहे.

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046